ePaper

| वर्ष - 7 | अंक -34 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दि. 30 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# भाजपचे आजपासून 'महाजनसंपर्क अभियान




## आतील पानांत

- धंगेकर की मोहन जोशी?
- महिला कुस्तीपटूंच्या अटकेच्या निषेधार्थ पिंपरीत राष्ट्रवादीचे आंदोलन!
- शहरा
- महावितरणच्या अधिकाऱ्यांना दणका!


## हिंजवडी आयटी पार्क परिसरात असणाऱ्या लक्ष्मी चौक येथे

# पुन्हा होर्डिंग कोसळले!

### दोन तरुण जखमी, थोडक्यात टळली मोठी दुर्घटना, जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहरात काही दिवसांपूर्वी किवळे येथे लोखंडी होर्डिंग कोसळून पाच जणांचा मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असतानाच आज दुपारच्या सुमारास हिंजवडी आयटी पार्क परिसरात असणाऱ्या लक्ष्मी चौक येथे पुन्हा एक मोठे होर्डिंग कोसळले आहे. यात दोन तरुण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र अलगतरित्या हे होर्डिंग पडल्याने सुदैवाने यात जीवितहानी झाली नाही.**



याबाबत अधिक माहिती अशी की, हिंजवडी परिसरात अनेक अनधिकृत होर्डिंग आहेत. मात्र प्रशासनाकडून कधी कारवाई केली जाते, तर कधी कारवाईला टाळाटाळ केली जाते.

अशातच आज दुपारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू होता. त्यासाठी रस्त्याने येणाऱ्या नागरिकांनी होर्डिंगखाली आश्रय घेतला. दुपारी साधारण तीन ते साडेतीन वाजताच्या सुमारास हिंजवडी आयटी पार्क येथील लक्ष्मी चौकात असणाऱ्या रस्त्यावरील एक होर्डिंग वादळी वारे सुरू असल्याने रस्त्यावरच कोसळले.

या दुर्घटनेत चार चाकी आणि दुचाकी वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. या भागात मोठी वाहतूक कोंडी झाली होती. तसेच घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

### पावसाळा सुरू होण्याआधी कारवाई करावी

दरम्यान, सदर होर्डिंग कोणी लावले होते, याबाबतची माहिती अद्याप तरी समोर आलेली नाही. हे होर्डिंग पडल्याने किवळे येथील दुर्घटनेच्या कटू आठवणी ताज्या झाल्या. तसंच या घटनेने अनधिकृत होर्डिंगचा प्रश्न पुन्हा समोर आला आहे. त्यामुळे पावसाळा सुरू होण्याआधी प्रशासनाने याबाबत कडक कारवाई करावी, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत तफावत नकोच!

### आमदार अश्विनी जगताप : महापालिका आयुक्तांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाजविकास विभागाच्या वतीने कल्याणकारी योजनेअंतर्गत दहावी आणि बारावीच्या वेगवेगळ्या बोर्डाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना वेगवेगळी शिष्यवृत्ती म्हणून प्रोत्साहनपर बक्षिस रक्कम दिली जात आहे. महापालिका प्रशासनाने असा भेदभाव न करता सर्व प्रकारच्या बोर्डातील विद्यार्थ्यांना समान रक्कम द्यावी. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती रक्कमेतील तफावत पूर्ववत करावी, अशी मागणी आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.**

महापालिका प्रशासन भेदभाव करत असल्याची भावना विद्यार्थ्यांच्या बालमनांमध्ये निर्माण करू नका, अशी सूचनाही त्यांनी आयुक्तांना केली आहे. यासंदर्भात आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, "पिंपरी-चिंचवड महEपालिकेच्या समाजविकास विभागाच्या वतीने इतर कल्याणकारी योजनेअंतर्गत मनपा क्षेत्रातील इयत्ता दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक स्वरुपात शिष्यवृत्तीची रक्कम प्रोत्साहनपर बक्षीस स्वरुपात प्रदान करण्यात येते. दहावीतील एसएससी बोर्डाच्या गुणवंत विद्यार्थ्याला १० हजार रुपये व १५ हजार रुपये शिष्यवृत्ती म्हणून दिली जाते. तेवढेच गुण प्राप्त केलेल्या सीबीएससी आणि आयसीएससी बोर्डाच्या गुणवंत विद्यार्थ्याला ५ हजार रुपये शिष्यवृत्ती म्हणून दिली जाते. त्याचप्रमाणे बारावीच्या एसएससी बोर्डाच्या गुणवंत विद्यार्थ्यांनाही १० हजार आणि १५ हजार रुपये शिष्यवृत्ती म्हणून दिली जाते.



> सर्वांना समान न्याय देण्याच्या तत्त्वास अनुसरून एसएससी बोर्ड, सीबीएससी बोर्ड आणि आयसीएससी बोर्ड असा भेदभाव न करता दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची समान रक्कम अदा करावी. त्यासाठी शिष्यवृत्ती रक्कमेतील तफावत पूर्ववत करावी. गुणवंत विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय दूर करावा. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या बालमनात महापालिका प्रशासन भेदभाव करत असल्याची भावना निर्माण होणार नाही. नैसर्गिक न्यायाच्या तत्वाप्रमाणे शिष्यवृत्ती रक्कमेतील तफावत दूर करावी
>
> -अश्विनी जगताप, आमदार.

## पुण्यातील पोटनिवडणुकीत

# धंगेकर की मोहन जोशी?

### काँग्रेसच्या उमेदवाराबाबत नेत्याचं सूचक वक्तव्य

।पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुण्याचे दिवंगत खासदार गिरीश बापट यांचं निधन झाल्यानंतर पुण्याची लोकसभेची जागा रिक्त झाल्या असून लवकरच या जागेवर पोटनिवडणूक लागण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाची तयारी देखील अंतिम टप्प्यात आली आहे. त्यामुळे आता भाजपसहित सर्वच पक्षांनी या पोटनिवडणुकीची तयारी सुरू केल्याचे पाहायला मिळत आहे. एकीकडे महाविकास आघाडीत ही जागा काँग्रेस लढणार की राष्ट्रवादी काँग्रेस यावरून संघर्ष सुरू असताना काँग्रेसमध्येदेखील उमेदवारीसाठी रस्सीखेच पाहायला मिळत आहे.**



काँग्रेस पक्षातून शहराध्यक्ष अरविंद शिंदे, मोहन जोशी आणि आमदार रवींद्र धंगेकर यांची नावे चर्चेत आहेत. तर लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठी रवींद्र धंगेकर यांना तयारी करण्याचे आदेश दिल्याची बातमी समोर आली होती मात्र या बातमीच स्वतः रवींद्र धंगेकर यांनी खंडन केल आहे.'मला पक्षाकडून कोणताही आदेश आलेला नाही. मी आता कुठे आमदार झालोय ही पोट निवडणूक आहे हा काळ छोटा आहे. २०१९ साली मोहन जोशी यांनी निवडणूक लढवली होती. त्यामुळे पक्ष त्यांचाच विचार करेल असं मला वाटतं. कारण यापूर्वी त्यांनी पुण्याच्या दोन लोकसभेच्या निवडणुकी लढवल्या आहेत त्याचा त्यांना अनुभव आहे. त्या निवडणुकात देखील त्यांनी चांगली मत घेतली होती आणि आता तर वारं बदलल आहे. मी अजून आमदार आहे पक्षात छोटा कार्यकर्ता आहे. मोहन दादांच्या वयात जायला मला अजून दहा वर्ष बाकी आहेत,त्यामुळे मी पहिल्या दिवसापासून ही निवडणूक लढायला इच्छुक नाही. नंतर पक्ष कधी संधी देईल तेव्हा मी आहेच.' असं रवींद्र धंगेकर म्हणाले आहेत.

मात्र, दुसरीकडे काँग्रेसमध्ये पुणे लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवार कोण असावा यावर मोठी रस्सीखेच सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. मोहन जोशी आणि रवींद्र धंगेकर यांच्या उमेदवारीच्या चर्चेवर काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी बोलणं मात्र टाळला आहे. 'पक्षाला जो उमेदवार योग्य वाटेल तो पक्ष देईल. मी पक्षाचा एकनिष्ठ आणि पाईक कार्यकर्ता आहे. माझ्याबरोबर अनेक सक्षम उमेदवार आहेत त्यामुळे शहराध्यक्ष म्हणून ती निवडून आणण्याची जबाबदारी माझी असेल'. अस शिंदे म्हणालेत.


#### काँग्रेसमध्ये देखील उमेदवारीसाठी रस्सीखेच

तर मोहन जोशी यांचा देखील नाव उमेदवार म्हणून पुढे येत आहे आणि धंगेकर यांच्या नावाची देखील चर्चा आहे असं अरविंद शिंदे यांना विचारल असता त्यांनी यावर सरळ बोलणं टाळलं असून फक्त 'नो कमेंट्स' इतकच उत्तर दिला आहे. त्यामुळे एकीकडे महाविकास आघाडीमध्ये ही जागा कोण लढणार यावरून संघर्ष सुरू असताना आता काँग्रेसमध्ये देखील उमेदवारीसाठी मोठी रस्सीखेच असल्याचं पाहायला मिळतंय.

---

## ...म्हणून प्रेयसीने प्रियकराला संपविले, वाघोली खून प्रकरणाचा झाला धक्कादायक उलगडा

।पुणे ।महाईन्यूज ।



पुण्यातील वाघोली परिसरात अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असलेल्या प्रेयसीने प्रियकराचा भाजी कापण्याच्या चाकूने भोकसून खून केला होता. त्यानंतर तिने देखील स्वत:च्या हाताची नस कापून घेतली होती. मात्र, वसतिगृहातील मुलांमुळे तिचा जीव वाचला. सोमवारी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली होती. पोलिसांनी आता त्या खून करणाऱ्या प्रेयसीला अटक केली आहे. ही माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. यशवंत अशोक मुंढे (वय २२, सध्या रा. वाघोली, मूळ, रा. लातूर) असे मृताचे नाव आहे, तर अनुजा महेश पनाळे (वय २१, सध्या रा. वाघोली, मूळ रा. अहमदनगर ) असे खून करणाऱ्या प्रेयसीचे नाव आहे. दोघेही वाघोलीतील रायसोनी महाविद्यालयात कॉम्प्युटर सायन्सच्या द्वितीय वर्षात शिकत होते. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनुजा आणि यशवंत यांच्यात प्रेमसंबंध होते. तसेच यशवंत हा तिच्यावर संशय घेत तिला मानसिक त्रास देत होता. तिच्यावर अनेक बंधने देखील आणत होता. त्यामुळे त्यांच्यात अनेकदा वाद होत होते. या संदर्भात त्यांच्या घरच्यांना देखील माहिती असल्याची माहिती समोर आली आहे. रविवारी रात्री अनुजा ही यशवंत रहात असलेल्या वसतिगृहात अभ्यासासाठी गेली होती. त्यांचे सोमवारी पहाटेच्या सुमारास पुन्हा जोरात भांडण झाले. त्या भांडणात अनुजा हिने यशवंत याच्या छातीवर आणि पोटावर वार केले. त्यामुळे यशवंत याचा जागेवरच मृत्यू झाला. घटना घडल्यानंतर ती घाबरली. तिने स्वताच्या हाताची नस कापून घेतली.

## महिला कुस्तीपटूंच्या अटकेच्या निषेधार्थ पिंपरीत राष्ट्रवादीचे आंदोलन!

### राष्ट्रवादीच्या महिला कार्यकर्त्यांनी विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडला

।पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज

**ब्रिजभूषण सिंह यांना अटक झालीच पाहिजे. 'खिलाडियों के सन्मान में, राष्ट्रवादी मैदान में', पंतप्रधान नरेंद्र मोदी राजीनामा द्या, अशा घोषणा देत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने दिल्लीमध्ये महिला कुस्तीपटूंना झालेल्या मारहाण व अटकेच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आले. पिंपरी- चिंचवड राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या वतीने पिंपरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आंदोलन झाले. या वेळी राष्ट्रवादीच्या महिला कार्यकर्त्या, पदाधिकारी उपस्थित होत्या.**



शहराध्यक्ष कविता आल्हाट म्हणाल्या की, राष्ट्रीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष व भाजपचे खासदार ब्रिजभूषण सिंग यांच्याविरोधात सात कुस्तीपटूंनी लैंगिक छळाचे गुन्हे दाखल केले आहेत. परंतु, दिल्ली पोलिसांनी कोणतीही कारवाई न केल्यानंतर कुस्तीपटूंनी गेल्या २३ एप्रिलपासून जंतरमंतर येथे आंदोलन सुरू केले होते. नव्या संसद भवनासमोर महिलांची 'खाप पंचायत' करण्याची घोषणा कुस्तीपटूंनी केल्याने पोलिसांनी कुस्तीपटूंवर कारवाई केली, यात बजरंग पुनिया, विनेश फोगाट व साक्षी मलिक यांना पोलिसांनी बळाचा वापर करून ताब्यात घेतले. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नवीन संसद भवनाचे उद्घाटन करत असताना दुसरीकडे भारतीय महिला कुस्तीपटू आपल्या न्यायहक्कांसाठी आंदोलन करीत होते. परंतु यांना संसद भवनाचे उद्घाटन करण्यातच जास्त रस दिसत होता. हे चित्र अतिशय दुर्दैवी आहे खेळाडू जेव्हा देशासाठी पदक जिंकतात, तिरंगा अंगाखांद्यावर घेऊन भावुक होतात, आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची मान उंचावतात, तेव्हा अभिमानाने ऊर भरून येतो. घडलेले दृश्य मान शरमेने झुकवणारे आणि अंतर्मुख होऊन पाहायला लावणारे आहे. लोकशाहीकडून हुकूमशाहीकडे वाटचाल होते की काय, असे वाटायला लागले.

खेळाडूंच्या आंदोलनानंतर व कालच्या या घटनेनंतर राष्ट्रवादी महिला काँग्रेस पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने ब्रिजभूषण सिंग यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा नाही तर क्रीडा संघटनेच्या वतीने व शहराच्या वतीने अतिशय तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला.

# महावितरणच्या अधिकाऱ्यांना दणका!

## महेश लांडगे : मला आंदोलनाचा शो करायचा नाही, समस्या सोडवा!

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी आणि परिसरातील वीज समस्यांसदर्भात प्रशासन बेजाबदारपणे वागत असून, २४ तासांत वीज पुरवठा सुरळीत करा अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जाण्यास तयार रहा. नागरिकांच्या आंदोलनाचे नेतृत्व मी स्वत: करेन. मला आंदोलन करुन शो करायचा नाही, लोकांच्या समस्या सोडवा, असा इशारा भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी दिला आहे.**



विशेष म्हणजे, आमदार लांडगे यांनी बैठकीतून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन लावला. अधिकारी मनमानीपणे कारभार करीत असून, नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री कार्यालयातूनही महावितरणच्या कारभाराची झाडाझडती झाली.

मोशी, प्राधिकरण, गव्हाणे वस्ती, भोसरी गावठाण, चक्रपाणी वसाहत, इंद्रायणीनगर या भागातील वारंवार वीजपुरवठा खंडीत होत आहे. यापार्श्वभूमीवर आमदार लांडगे यांनी महावितरण कार्यालयात धडक दिली. भोसरी पावर हाऊस येथील महावितरण कार्यालय येथे तातडीची बैठक घेण्यात आली. यावेळी महावितरणचे पुणे जिल्ह्याचे अधीक्षक अभियंता सतीश राजदीप, कार्यकारी अभियंता उदय भोसले, दत्ता गव्हाणे, योगेश लोंढे, सम्राट फुगे, शिवराज लांडगे, दिनेश यादव, निखील काळकुटे यांच्यासह पदाधिकारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते. यावेळी आमदार लांडगे यांनी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना धारेवर धरले. गेल्या दोन वर्षांपासून हेतुपुरस्सर भोसरीकरांना वीज समस्या निर्माण केल्या जात आहेत. अनेकदा विनंती, निवेदने देवूनही महावितरणचे अधिकारी उद्धटपणे उत्तरे दिली जात आहे. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी दाद मागायची कुणाकडे? असा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरात सोमवारी सोसाट्याचा वारा आणि गारांवा पाऊस झाला. त्यामुळे अनेक ठिकाणी वीज पुरवठा खंडीत झाला असून, मंगळवारी दुपारीपर्यंत वीज बंद होती. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढल्या. या पाश्वभूमीवर आमदार लांडगे यांनी महावितरण कार्यालयात बैठक घेतली.

### काय आहेत नागरिकांच्या समस्या?

» भोसरीसह परिसरातील वीजपुरवठा वारंवार खंडीत होणे. कमी दाबाचा वीजपूरवठा त्यामुळे घरगुती उपकरणाचे नुकसान होणे. महावितरण कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची दुरूस्तीच्या कामासाठी दिरंगाई होणे. सर्वसामान्य नागरिक तक्रार करण्यास गेल्यानंतर अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून उद्धटपणे उत्तरे मिळणे. अधिकाऱ्यांची उदासीन भूमिका असणे. अशा विविध तक्रारींबाबत बैठकीत चर्चा झाली. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी याबाबत सकारात्मक भूमिकेतून कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

“महावितरण अधिकाऱ्यांच्या वेळकाढूपणामुळे सर्वसामान्य नागरिकांना वीज समस्येचा सामना करावा लागत आहे. महावितरणची जी कामे प्रस्तावित आहेत. त्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव तयार करण्याची सूचना केली आहे. पावसाळ्यापूर्वी दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करणे अपेक्षीत आहे. याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा आहे. अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असा इशाराही दिला आहे.

- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या परीक्षेत गैरप्रकार!

## सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा केला गैरवापर

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विभागांतील ‘ब’ आणि ‘क’ गटातील १५ पदांच्या ३८८ जागांसाठी झालेल्या परीक्षेत तीन केंद्रांवर कॉपीचे प्रकार घडले. परीक्षार्थींच्या कानात सूक्ष्म ‘इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस कनेक्टर’ आढळून आले. एकाने बदली (डमी) परीक्षार्थी बसविला होता. याप्रकरणी मुंबई, नाशिकमध्ये पाच जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.**

नाशिक केंद्रावर झालेल्या गैरप्रकार प्रकरणी महापालिकेचे अधिकारी नाना मोरे यांनी नाशिक पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार राहुल मोहन नागलोथ, अर्जुन हारसिंग मेहेर आणि अर्जुन रामधन राजपूत (तिघे रा. औरंगाबाद) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये मूळ परीक्षार्थी हा मेहेर असताना त्याच्या जागी नागलोथ हा परीक्षेसाठी बसला होता. नागलोथ हा बदली परीक्षार्थी कानात डिव्हाईसव्दारे




प्रश्न सांगून उत्तर ऐकत होता. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कानात लहान असे डिव्हाइस सापडले. त्याच्याकडून दोन सिमकार्ड, एक मेमरी कार्ड जप्त केले. त्याच्यासह फोनवरून उत्तरे सांगणाऱ्या राजपूत, मूळ परीक्षार्थी मेहेर याच्यावर गुन्हा दाखल केला.

मुंबई केंद्रावरील कॉपीप्रकरणात अभियंता संजय चव्हाण यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार सखाराम अंबादास बहीर (रा. शिरपूर, बीड) आणि त्याच्या साथीदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सखाराम हा डिव्हाईसव्दारे कॉपी करत असल्याचे आढळून आले. अंगझडती घेण्यापूर्वीच त्याने मोबाइल खाली फेकून दिला. दोन्ही घटनांचा नाशिक आणि मुंबई पोलीस तपास करत आहेत. दोघेही लिपिक पदासाठी परीक्षा देत होते. आरोपींनी कागदामध्ये गुंडाळून डिव्हाईस, मोबाइल फोन केंद्रामध्ये नेला होता. केंद्रावर जॅमर बसविला असतानाही आरोपींनी मोबाइल फोन आतमध्ये नेल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### 15 दिवसांत निकाल

» महापालिकेच्या ३८८ जागांसाठी २६ ते २८ मे रोजी राज्यातील २६ जिल्ह्यांतील ९८ केंद्रांवर परीक्षा झाली. अर्ज केलेल्या ८५ हजार ३८७ पैकी ५५ हजार ८२ परीक्षार्थींनी परीक्षा दिली. सहायक उद्यान अधीक्षक पदासाठीचे आरक्षण बदलामुळे ८९ उमेदवारांचे पैसे परत दिले जाणार आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) पूर्वपरीक्षेला बसलेल्या आणि महापालिकेच्या परीक्षेसाठी अर्ज केलेल्या ८३ परीक्षार्थींची लवकरच परीक्षा घेण्यात येणार आहे. १५ दिवसांत निकाल जाहीर होणार आहे.

# कर्मवीरांच्या शैक्षणित प्रवासातील अण्णा 'क्रांती'!



मनोगत

- क्रांती बांदल

**"इथे हार मानणारी माणसं चालत नाहीत मला.. रडून झालं की उठ अन् अभ्यासाला लाग.. हार मानायची असेल तर माझ्या वडा खाली बसू नको" मी अस म्हणाले की मला अण्णा अस कानात येऊन सांगतात.. हे खर नाही वाटणार ना.. पण मी माझा प्रवास सांगितल्या वर तुम्हाला हे खर वाटेल...**

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ अण्णा यांची ६४ वी पुण्यतिथी नुकतीच साजरी झाली. अन् मला त्यानिमित्ताने माझ्या जीवनाचा प्रवास थोडा फार सुलभ व्हावा म्हणून अण्णा मला दुसऱ्याच्या रूपांत येऊन वेगवेगळ्या प्रसंगी कसे मार्गदर्शक झाले हे सांगावस वाटले.. "तू जिद्द सोडू नकोस मी आहे तुझ्यासोबत."

इंद्रायणी मध्ये तुकाराम महाराजांची गाथा जरी बुडाली असली तरी अनेक लोकांच्या तोंडी आजही गायली जाते म्हणजेच तुकारामांचे अभंग आजही आपल्या देशात अस्तित्वात आहेत. त्याचप्रमाणे कर्मवीर अण्णांचे विचार, शिक्षणाबाबत त्यांची तळमळ आजही अनेक लोकांच्या आचरणात मला अनुभवण्यास मिळाली.

सरजी मला असा जॉब द्या ना कॉलेज वर ज्यातून मला शिकता पण येईल अन् शिकताना शिक्षणासाठी लागणारी आर्थिक गरज पण माझी भागेल... काही कारणांनी मला काम नाही मिळालं पण मी त्याच वेळेला म्हणाले.." मी ज्या वडाखाली उभी आहे तीथून शिक्षण घेतल्याशिवाय मला अण्णा जाऊन देणार नाहीत".. तो माझा विश्वास होता.अण्णा वरती अन् त्यांच्या तत्वांनी पेरलेल्या माणसांवरती...

आज मी ४ वर्ष झाले या संस्थेच्या कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे... कसलाही आर्थिक सोर्स अन् मानसिक साथ नसताना...फक्त अण्णांमुळेच... 2019 सालापासून मी छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा इथे शिक्षण घेत आहे... मी या कॉलेजमध्ये आले तेव्हा माझी तयारी इथून होती की... मला खायला, राहायला, अन् पुस्तकांची सोय नव्हती.... काही थोडके पैसे भरून मी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला... तयारी ठेवली की काही झालं तरी शिक्षण घेतल्या शिवाय इथून बाहेर पडायचं नाही... हॉस्टेलला प्रवेश मिळाला. पहिल्याच दिवशी मला रडू आल..जेवणच भेटलं नाही. त्यात कोरोना काळ चालू होता... घरी कोरोना महामारीत काय झालं होत माहित नाही पण मला दिसायला कमी लागलं... कॉलेजमध्ये नुसतं लेक्चर करायचं... म्हणजे नुसतं ऐकण्याच काम करायचं... वाचन नव्हतं होत कारण माझी दृष्टीच कमकुवत झाली होती. काहीच निट दिसतच नव्हतं... डॉक्टरांकडे गेले तर त्यांनी मला डोळ्यांचा रिपोर्ट आणायला सांगितला. तो पण कराडवरून... मी काय गेले नाही डॉक्टरांना सगळी परिस्थिती सांगितली. त्यांनी तात्पुरती तिथेच ट्रीटमेंट दिली... पण डोळ्यांचा प्रश्न आहे. रिपोर्ट काढून घे अशी सूचना त्यांनी मला दिली होती... विशेष म्हणजे मला त्यांनी दिलेल्या दवा नी माझे डोळे बरे झाले. वेळ गेला पण मला बर वाटायला लागलं... चष्मा लागला डोळ्यांना. आता पैसे कुठे आहेत माझ्याकडे. कॉलेजमध्यल्या खूप मोठ्या अर्थतज्ज्ञांना भेटले अन् त्यांना सगळ सांगितलं अन् मदत मागीतली... मी कॉलेजमध्ये नवीन होते... तरी त्यांनी



मला मदत करायला मागे-पुढे बघितलं नाही. त्यांनी मला चष्म्यासाठी पैसे दिले... पुढे संकट येतच गेली. अशातच मला रुममेट म्हणून मानसशास्त्राच्या खूप मोठ्या प्रोफेसर भेटल्या.. त्यांची अन् माझी खूपच छान मैत्री झाली... त्यावेळी मी त्यांना काहीच सांगितलं नव्हतं... पण त्या शेवटी मनाचेतज्ज्ञ त्या माझ्याबरोबर राहत आहेत. त्याला आज दीड वर्ष झाले... जेवणाचा, राहण्याचा, कपड्यांचा दवाखान्याचा असा सर्व खर्च त्या स्वतःच करतात... त्याच दिवसात मला कॉलेजचे हॉस्टेल सोडून तामजाई नगरला यावं लागलं..माझ्या फ्रेंडमुळे मला तिथे राहण्याची सोय झाली होती... मी तिथे येणार तर चांगले सोईचे चाललेले मॅडमनी सोडलं अन् माझ्या बरोबर राहायला आल्या... का माहिती आहे का कारण मी तिथे उपाशी राहू नये म्हणून... खरंच होत ते उपाशी पोटी अभ्यास होत नसतो. असे त्या म्हणत. कारण जेवणासाठी माझ्याकडे काही पर्याय नव्हता... एक महिना मला जेवण फक्त एकच टाईम भेटलं.. त्यात ही मॅडमनी मला साथ दिली. त्यांचा डबा मला त्या देत... माझ्यासाठी त्याही उपाशी राहिल्या बरं त्यांना पैसे नव्हते म्हणून त्या उपाशी नव्हत्या. आम्ही जिथे राहायला गेलो होतो तिथे मेसची सोय नव्हती. कॉलेजच्या मेसमधूनच सकाळी हे जेवण होते तेच फक्त भेटायचं.... संध्याकाळी मॅगी किंव्हा बिस्कीट... माझ्यासाठी चांगली सुविधा सोडून त्या आल्या होत्या... आज मला हा प्रसंग लिहिताना खूप रडू येत आहे ..कारण त्या जोपर्यंत माझे पोट भरतं नाही. तोपर्यंत त्या जेवायच्या नाहीत. कारण काही ही सांगायच्या अन् मला जेवायला लावायच्या ... नंतर मला जेवण हाताने करता यावं म्हणून भूगोलचे प्रोफेसर म्हणून आहेत त्यांनी मला शेगडी दिली. अन् माझी जेवणाची गैरसोय दूर झाली... असे बरेच शिक्षक या कॉलेजमध्ये मला भेटले. जसे की माझे पॉलिटिकल सायन्सचे गुरू ज्यांनी माझी MA ची एडमिशन फी भरली... माझ्या इतिहासच्या मॅडम ज्या मला इतर फीसाठी न कारण विचारत मदत करतात... आणि मी ज्यांच्याकडे कुठलाही विषय घेऊन जाते अन् मार्ग विचारते ते ही स्वतःचा खूप अनमोल वेळ काढून मला मार्गदर्शन करतात. जे खूप मोठ्या मनाचे डॉक्टर आहेत. त्यांचा ही उल्लेख मला या ठिकाणी करावासा वाटतो ...पण नाव कोणाचेच लिहू शकत नाही... मी हे सगळे प्रसंग का सांगते बघा हा ..हे सगळं वाचल्या नंतर तुम्हाला अस लक्षात येईल की ..ही सगळी अण्णांच्या तत्वाच्या विचारानेच पेरलेली लोक आहेत ना... जी माझ्यासाठी जणू अण्णांनीच पाठवली होती... झालं ना खरं... नाहीतर या सर्व व्यक्ती माझ्या जीवनात येण्याचं कारण काय?..का त्या मॅडम माझ्याच रूममध्ये राहायला आल्या... का त्या अर्थतज्ज्ञांनी माझ्यासारख्या अनोळखी मुलीला मदत केली... का त्या सरांनी मला गॅस दिला. त्यांच्याकडे काय पैसे जास्त झाले होते.

मला जेव्हा अभ्यास करायचा होता तेव्हा मी मुंबईमध्ये बसूनच हे कॉलेज सर्च केलं होतं अन् मला विश्वास होता की मला माझे टार्गेट गाठायला.. फक्त अन् फक्त अण्णाच मदत करतील.. अण्णांनी लावलेल्या वडा खालून कोणीही शिक्षण न घेता गेलं नाही.. मग मी तरी कशी जाईन... आज मी या पावनभूमीत कसली ही काळजी न करता जिज्ञासूवृत्तीने अध्ययन करत आहे. ज्याभूमीत अण्णांनी पुण्य पाऊल ठेवले अन् पहिलं वडाच झाड लावलं.

जय कर्मवीर!

## संपादकीय »

### आधारकाठी टिकायला हवी!

***सोडून दिलेल्या वयोवृद्ध व्यक्तींसाठी 'वृद्धाश्रम' या विचारापासून काळाची गरज इथपर्यंत आता समाजाची मानसिकता बदलली आहे. वाढत्या आयुर्मर्यादेमुळे वृद्धाश्रमांची गरज वाढती असताना त्यांची संख्या कमी होत आहे.***

वृद्धाश्रम म्हणजे टाकून दिलेल्या, सोडून दिलेल्या वयोवृद्ध माणसांचे राहण्याचे ठिकाण, या समजुतीने आता कात टाकली आहे. बदलती जीवनशैली, प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञान, प्रभावी उपचारपद्धती यामुळे मागील काही वर्षांत आयुर्मान वाढते आहे. पन्नाशीच्या घरात असणारी मुले ८०-८५च्या वयोगटातील पालकांची काळजी घेताना दिसतात. समाजाला वृद्धाश्रमांची गरज अन् महत्त्व दोन्ही पटले आहे.

सामाजिक संस्थांच्या माध्यमातून चालवण्यात येणारे, मोफत तसेच खासगी असे तीन प्रकारचे वृद्धाश्रम मुंबईमध्ये आहेत. १५-२० वर्षांपूर्वी मुंबईमध्ये नोंदणीकृत वृद्धाश्रमांची संख्या दोनशेच्या घरात होती. नोंदणी नसताना केलेल्या संस्थांची त्याहून अधिक.


**महाराष्ट्रात चपातीसह भाकरीचाही आहारात मोठ्या प्रमाणात समावेश असतो. तांदळाची भाकरी मऊसर, तर नाचणी, ज्वारी आणि बाजरीची भाकरी तुलनेने कडक होते. चपातीपेक्षा भाकरी तब्येतीसाठी उत्तम हे तुम्ही अनेकदा ऐकले असेल. ग्लुटेन फ्री डाएटचा सध्या ट्रेंड आहे. वजन कमी करण्यासाठी अनेक जण चपाती खाणे टाळत आहे.**

## चपाती की भाकरी?

आपण वर्षानुवर्षं खात असलेला गहू अचानकपणे आहारातून वगळायला लागलो आहोत. असे केल्याने वजन खरेच नियंत्रणात राहते का, चपाती कधी व किती खावी, कोणती भाकरी कधी खावी, नाचणी-बाजरीची भाकरी खाल्ल्याने काय फायदे होतात, असे अनेक प्रश्न आपल्यामनात असतात.

माझ्या रोजच्या प्रॅक्टिसमध्ये अनेकांनी गहू आहारातून वगळून टाकायला सुरुवात केल्याचे सांगितले. कारण विचारल्यावर त्यांच्यापैकी काहींनी सांगितले, की त्यांनी गुगल किंवा व्हॉट्स ॲपवर याबद्दल वाचले आणि त्यात वजन कमी करण्यास यामुळे मदत होत असल्याचा उल्लेख होता. काहींनी सांगितले, की ते गव्हामुळे ग्लुकोजचे प्रमाण वाढते आणि त्यामुळे मधुमेह होतो. काहींच्या मते, त्यात ग्लूटेन, म्हणजे एक प्रकारचे प्रोटिन आहे, जे पचण्यास कठीण आहे. मात्र, मी असेही काही लोक पाहिले आहेत, ज्यांनी आहारातून ग्लूटेन कमी केला आहे आणि ज्वारी, बाजरी, नाचणी यांसारख्या निरोगी धान्यांचे प्रमाण वाढवले आहे, तरीही त्यांचे वजन वाढतच आहे. त्यामागचे कारण म्हणजे, पोर्शन साइज. गहू, बाजरी, ज्वारी, नाचणी, तांदूळ या धान्यांतील आहारमूल्यांबाबत माहिती घेऊ.

गव्हाच्या रोट्या या खूप पातळ असतात, त्यांना फुलका असेही म्हणतात. गव्हातील ग्लुटेनमुळे पातळ फुलके लाटता येतात; परंतु इतर धान्यांमध्ये ते अनुपस्थित आहे; म्हणून ते फुलक्यांमध्ये लाटता येत नाहीत. भाकरी बनवताना धान्य किंवा आट्याचे प्रमाण वाढते. कधी कधी ते गव्हाच्या आट्यापेक्षा जवळजवळ दुप्पट असते. जेव्हा



दोन फुलक्याच्या जागी दोन भाकरी घेतल्या जातात, तेव्हा तुम्ही खात असलेल्या कॅलरी दुप्पट होतात. म्हणून वजन कमी होण्याऐवजी वाढू लागते. सर्व तृणधान्यांचा विचार केल्यास लक्षात येते, की उत्तम चवीचे खाद्यपदार्थ बनवण्यासाठी वापरले जाणारे लोकप्रिय आणि वैशिष्ट्यपूर्ण तृणधान्य म्हणजे गहू. गव्हापासून पुरी, फुलके, पोळी, कुलचा, पराठे, नान असे अनेक पदार्थ बनवता येतात. बहुतेक देशांमध्ये याचा वापर पाव बनवण्यासाठीही केला जातो. पुरणपोळी, तीळ-गुळपोळी, खव्याची पोळी, मांडे यांसारखे नाजूक पदार्थही त्यापासून बनतात. गव्हामध्ये ग्लायडिन व ग्लुटेनिन ही दोन प्रकारची प्रथिने असतात. चपातीसाठी आपण कणिक मळतो, तेव्हा गव्हाच्या पिठात पाणी मिसळल्यानंतर प्रथिनांचे रेणू पाणी शोषून घेतात आणि प्रसरण पावून मोठे होतात, एकमेकांना चिकटतात आणि त्यापासून त्यांच्या साखळ्या तयार होऊ लागतात. या साखळ्यामुळे रेणूचे जे जाळे गव्हात तयार होते; त्यामुळे नवीन प्रथिन म्हणजे ग्लूटेन तयार होते. पोळी उत्तम होणे हे पिठातील ग्लूटेनचं प्रमाण आणि त्याच्या जाळ्याचा पक्केपणा यावर अवलंबून असते.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कुस्तीगिरांना मिळालेल्या वागणुकीचा जागतिक संघटनेकडून निषेध!

## भारतीय कुस्ती महासंघावर निलंबनाच्या कारवाईचाही इशारा

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या कुस्तीगिरांना मिळालेल्या वागणूकीचा निषेध करत जागतिक कुस्ती संघटनेने मंगळवारी भारतीय कुस्ती महासंघ निलंबित करण्याचा इशाराही दिला. भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या कुस्तीगिरांना मिळालेल्या वागणूकीचा निषेध करत जागतिक कुस्ती संघटनेने मंगळवारी भारतीय कुस्ती महासंघ निलंबित करण्याचा इशाराही दिला.ब्रिजभूषण यांच्याविरोधात उभे राहिलेल्या भारतीय कुस्तीगिरांचे आंदोलन रोखताना कुस्तिगीरांना दिलेल्या वागणूकीचा निषेध करणारे 'ट्वीट' जागतिक कुस्ती महासंघाने केले.**



भारतीय कुस्ती क्षेत्रात सध्या जे काही सुरु आहे त्याकडे जागतिक संघटना कायम नजर ठेवून होती. आंदोलक कुस्तीगिरांची ज्या पद्धतीने धरपकड करण्यात आली ती कृती निषेधार्हच आहे. आमच्या जागतिक संघटनेच्या प्रशासकीय यंत्रणेने याची दखल घेतली आहे.

भारतीय कुस्ती महासंघाला नव्या निवडणूकीची कार्यपद्धती तातडीने राबविण्याची सूचना केली आहे. याबाबतची माहिती त्वरित न दिल्यास भारतीय कुस्ती महासंघ निलंबित करण्याचा इशाराही जागतिक संघटनेने दिला आहे. विशेष म्हणजे कुस्तीगिरांच्या सुरुवातीच्या निषेधानंतर क्रीडा मंत्रालयाने महासंघाची निवडणूक प्रक्रिया स्थगित करून ती नव्याने राबविण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन केली होती. या समितीला यासाठी ४५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. आंदोलन जबरदस्तीने संपुष्टात आणल्यानंतर विनेश फोगट, बजरंग पुनिया, साक्षी मलिक या मल्लांनी आपली आंतरराष्ट्रीय पदके गंगा नदीत विसर्जित करण्याचा इशारा दिला. यानंतर तातडीने जागतिक कुस्ती महासंघाने या संदर्भातील आपले हे निवेदन सादर केले आहे. जागतिक संघटनेने महासंघाच्या निवडणुकीसंदर्भातील क्रीडा मंत्रालयाच्या हस्तक्षेपाचे स्वागत करून दिलेल्या ४५ दिवसांच्या मुदतीचा आदर केला. मात्र, ही मुदत देखील टळल्यास भारतीय कुस्ती महासंघाचा निलंबित केले जाईल, असा इशारा देताना जागतिक कुस्ती महासंघाने मार्च महिन्यात भारताकडून आशियाई कुस्ती स्पर्धेचे आयोजन काढून घेण्यात आलेल्या कारवाईची आठवण करून दिली.

> भारतीय कुस्तीपटूंना २८ मे रोजी मिळालेली वागणूक वाईट होती. जे घडले ते पाहून निराश झालो. योग्य संवादाने गोष्टी सोडवता येतात. यावर लवकरात लवकर तोडगा निघावा ही अपेक्षा.
> – **अनिल कुंबळे,** माजी क्रिकेटपटू

> कुस्तीपटूंना मिळालेल्या वागणूकीने दु:खी झालो. चांगल्या पद्धतीने या संघर्षाला सामोरे जाता आले असते.
> – **नीरज चोप्रा,** भालाफेकपटू

---

## प्राध्यापक भरतीसाठी १०९ महाविद्यालयांकडून प्रस्तावच नाही

। पुणे । महाईन्यूज



उच्च शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या खासगी अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक भरतीला मान्यता देण्यात आली आहे. मात्र एकीकडे राज्यातील महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याची, पदभरती होत नसल्याची ओरड केली जात असताना प्राध्यापक भरतीसाठी १०९ महाविद्यालयांनी ५३२ पदांच्या भरतीसाठी ना हरकत प्रमाणपत्रासाठीचा मागणी प्रस्ताव उच्च शिक्षण संचालनालयाकडे सादर केला नसल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित महाविद्यालयांनी येत्या १५ जूनपर्यंत ऑनलाइन प्रस्ताव सादर न केल्यास ती पदे अन्य महाविद्यालयांना वर्ग करण्याबाबत शासनाला प्रस्तावित करण्याचा इशारा उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिला.

राज्य शासनातर्फे २०१७ च्या विद्यार्थिसंख्येनुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक या संवर्गातील २०८८ पदांच्या भरतीसाठी मंजुरी देण्यात आली आहे. तसेच उच्च शिक्षण संचालनालयाने अनेकदा मुदतवाढ देऊन ना हरकत प्रमाणपत्र मागणी प्रस्ताव सादर करण्याबाबत परिपत्रके प्रसिद्ध केली. मात्र पदभरतीसाठी मंजूर असलेल्या पदांच्या भरतीसाठी १०९ महाविद्यालयांनी अजूनही ५३२ पदांसाठी ना हरकत प्रमाणपत्रासाठीचा ऑनलाइन प्रस्ताव सादर केलेला नाही. ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर न झालेल्या पदांची संख्या एकूण पदभरतीच्या जवळपास एकचतुर्थांश आहे.

---

## एकनाथ शिंदेंबरोबर असलेल्या खासदारांना शिंदेंच्या नाहीतर भाजपच्या तिकीटावर उभे रहायचे आहे!

### राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष जयंत पाटील यांचे मोठे विधान

। अंकारा । महाईन्यूज

**तुर्कस्तानचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगन यांनी अध्यक्षपदाची निवडणूक दुसऱ्या फेरीमध्ये जिंकत पुन्हा एकदा स्वत:कडेच सत्ता राखण्यात यश मिळवले. तुर्कस्तानात रविवारी दुसऱ्या फेरीसाठी झालेल्या मतदानात एर्दोगन यांना ५२ टक्के मते मिळाली. त्यामुळे आता ते पुढील पाच वर्षे राष्ट्राध्यक्ष राहणार आहेत. तुर्कस्तानचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगन यांनी अध्यक्षपदाची निवडणूक दुसऱ्या फेरीमध्ये जिंकत पुन्हा एकदा स्वत:कडेच सत्ता राखण्यात यश मिळवले.**



एकनाथ शिंदेंबरोबर असलेल्या खासदारांना शिंदेंच्या तिकिटावर नाहीतर...", जयंत पाटलांचं मोठं विधान पुढीलवर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. राज्यात ४८ लोकसभेच्या जागा आहेत. त्यासाठी महाविकास आघाडी आणि भाजपा-शिंदे गटाने कंबर कसली आहे. अशातच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी शिंदे गटाबाबत मोठं विधान केलं आहे. "शिंदे गटातील खासदारांना भाजपाच्या तिकीटावर उभं राहायचं आहे," असं जयंत पाटील म्हणाले आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील मतदारसंघाचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर जयंत पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. "यापूर्वी आम्ही ज्या लोकसभेच्या जागा लढवल्या होत्या, तेथील नेत्यांशी चर्चा करत आढावा घेण्याचं काम केलं," असं जयंत पाटलांनी सांगितलं.

"तसेच, एकनाथ शिंदे यांच्याबरोबर असलेले खासदार शिंदेंच्या तिकिटावर उभे राहण्यास इच्छूक नाहीत. बऱ्याच लोकांना भाजपाच्या तिकिटावर उभारण्याची इच्छा आहे. त्यामुळे शिंदे गटाची पंचायत झाली आहे. तसं झालं तर, एकनाथ शिंदेंबरोबर असलेला शिवसैनिक उद्धव ठाकरेंकडं जाण्याची शक्यता आहे," असं जयंत पाटलांनी म्हटलं.

#### "हा प्रश्न फडणवीसांना विचारला तर..."

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली आहे. याबद्दल विचारल्यावर जयंत पाटील म्हणाले, "हा प्रश्न फडणवीसांना विचारला तर जास्त बरे होईल. मला याबद्दल काहीच माहिती नाही. ते का गेले? त्यांना राज ठाकरेंच्या मदतीची आवश्यकता आहे किंवा राज ठाकरेंशिवाय जमणार नाही, यांची उत्तर फडणवीस देतील."

#### "लवकरच महाविकास आघाडीची बैठक"

महाविकास आघाडीची बैठक कधी होणार आहे? असं विचारल्यावर जयंत पाटलांनी म्हटलं की, "लवकरच महाविकास आघाडीची बैठक होणार आहे. शिवसेना आणि काँग्रेसकडून चाचपणी करण्यात येत आहे. आठवड्यात चाचपणी झाल्यावर लवकरात लवकर बैठक घेण्याचा प्रयत्न करू."

# अक्षया गुरव झाली ट्रोल



अभिनेत्री अक्षया गुरवने अनेक मालिका व चित्रपटांतून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. 'लव्ह लग्न लोचा' या मालिकेमुळे प्रसिद्धी झोतात आलेली अशी ही मराठमोळी अभिनेत्री अक्षया सोशल मीडियावरही फार सक्रिय असते. अक्षयाने नुकतेच बोल्ड फोटोशूट करत सोशल मीडियावरील चाहत्यांना त्याची झलक दिली आहे. पण बोल्ड फोटोशूट तिला चांगलेच महागात पडले आहे. या फोटोला नेटकऱ्यांनी चांगलेच ट्रोल केले आहे. या फोटोमध्ये अक्षयाने पांढऱ्या रंगाचा शर्ट घातला आहे. यावेळी तिने शर्टाची बटनं उघडी ठेवली आहे. त्यामुळे तीचा हॉट लुक काहींना पचनी पडलाय तर काहींनी अक्षयाचे हे फोटो पाहून चाहत्यांनी तिला फारशा बऱ्या प्रतिक्रिया दिल्या नसल्याचं दिसून येत आहे. अक्षयाने केलेल्या या बोल्ड फोटोशूटमुळे चाहत्यांनी तिला ट्रोल केले आहे. या फोटोवर चाहते संतापले आहेत. एकाने कमेंट करत "तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती. जेव्हा कलाकारांना काम मिळत नाही, तेव्हा ते शरीर प्रदर्शन करुन काम मिळवण्याचा प्रयत्न करतात", असे म्हटले आहे. तर दुसऱ्याने "अक्षया शरीर प्रदर्शन ही फॅशन नसून विकृती आहे. जी समाजाला अधोगतीकडे घेऊन जात आहे. त्यात आज तूसुद्धा तुझं योगदान दिलं आहेस", अशी प्रतिक्रिया दिली आहे. तर काहींनी हे अजिबात पटलं नाही असंही म्हंटलय. त्यामुळे तिच्या या फोटोची भलतीच चर्चा झाली आहे.

## मला माफ करा.. एका चुकीसाठी रितेशला मागावी लागली पत्रकारांची माफी..

प्रसिद्ध अभिनेता रितेश देशमुख हा सध्या त्याच्या आगामी 'वेड' चित्रपटामुळे चर्चेत आहे. 'वेड' या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी रितेश देशमुख कोल्हापूरात गेला होता आणि तिथे असे काही झाले की त्यामुळे रितेश देशमुखला पत्रकारांची जाहीर माफी मागावी लागली. या प्रकरणाची सध्या बरीच चर्चा आहे. रितेश देशमुख गेल्या काही दिवसांपासून वेड चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. अशातच तो कोल्हापूरातही त्याच्या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी गेला होता. यावेळी पत्रकारांशी त्याने संवाद साधावा यासाठी अनेक पत्रकार जमले होते. पण रितेशच्या मीडिया ऑर्गनायझरने पत्रकारांचा अपमान केला त्यांना बॉउन्सरच्या सहाय्याने हॉटेलमधून हाकलून लावले. त्यानंतर रितेशने सपत्नीक कोल्हापूरातील महालक्ष्मीचेही दर्शन घेतले. यावेळी रितेश मंदिरातून बाहेर पडताच पत्रकारांनी त्याला अडवले आणि जाब विचारला. परंतु या प्रकरणाबाबत मी अनभिज्ञ असल्याचे रितेशने त्यांना सांगितले आणि पत्रकारांची माफी मागत त्याने अवमान झालेल्या सर्व पत्रकारांची माफी मागितली. "तुमचा अवमान झाला. मला माफ करा. तुमच्यासोबत नक्की काय घडलं हे मला माहिती नाही. मी इथे आलो पण मला कोणाला भेटायचं आहे हेही माहिती नव्हतं. ते माझ्या हातातही नाही. तुमचा माझ्याकडून अवमान झाला असेल तर मी माफी मागतो. तुमच्या भावना माझ्यापर्यंत पोहचल्या आहेत, असे रितेश देशमुख म्हणाला. 'माझ्या लग्नाला ११ वर्षे झाली आहे. पण कोल्हापूरात महालक्ष्मीच्या दर्शनाला आम्हाला कधीच एकत्र येता आले नाही. काही लोकांची समोरासमोर भेट झाली नाही,. यांची मी माफी मागतो.



## बंद करा सिरियल!

सध्या कलर्स मराठीवर नवीन मालिकांची मेजवानी सुरू आहे. एकास एक नवीन विषय घेऊन कलर्स मराठी प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज झाली आहे. काही दिवसांपूर्वीच वाहिनीने 'शेतकरीच नवरा हवा..' ही आगळी वेगळी मालिका सुरू केली. अशाच दोन मालिका 'रमा -राघव' आणि 'पिरतीचा वणवा उरी पेटला' सध्या प्रक्षेपणाच्या तयारीत आहेत. आहेत त्यापैकी एक मालिका म्हणजेच 'पिरतीचा वनवा उरी पेटला' ही सुरू होण्याआधीच बंद करा आधी मागणी प्रेक्षकांनी केली आहे.




'पिरतीचा वनवा उरी पेटवा' ही मालिका येण्याआधीच मालिकेचा प्रोमो पाहून प्रेक्षक संतापले आहेत. या मालिकेचा प्रोमो काही दिवसांपूर्वी रिलीज झाला, यामध्ये दाखवण्यात आले आहे की, एक श्रीमंत बाई बॅग भरून पैसे घेऊन बँकेच्या बाहेर येते आणि आपल्या गाडीत ठेवते. त्याचवेळी एक मुलगी म्हणजे मालिकेतील नायिका त्या बाईला फसवून त्या पैशांची चोरी करते आणि तो चोरिचा पैसा गावच्या मुलांच्या हितासाठी उपयोग करणार आहे असेही सांगते.. 'आपण चोरी नाही करत,आपण लेव्हल करतो.. समाजात बॅलेन्स राहिला पाहिजे' असे तिचे ब्रीद आहे. यावरूनच आता प्रेक्षकांमध्ये संताप पाहायला मिळत आहे.प्रेक्षकांनी या प्रोमोवर नकारात्मक मत मांडले आहेत. "या असा सिरीयल मधुन समाजात गुन्हेगारीच प्रमाण अजून वाढणार..", " चोरी ती चोरीच असते त्यातून घेतलेला पैसा हा गुन्हा असतो..", " अशा चोरिच्या पैशाने शिक्षण नाही तर गुन्हागारी शिकवली जात आहे"

## कंगनाला 'पद्मश्री'

बॉलीवूडची क्वीन म्हणून कंगना रनौतची ओळख आहे. सोशल मीडियावर नेहमीच कंगना वेगवेगळया विषयावर प्रतिक्रिया देताना दिसते. असा एकही विषय नाही की कंगनानं त्यावर आपली प्रतिक्रिया जाहीरपणे व्यक्त केलेली नाही. शेतकऱ्यांचे आंदोलन ते देशाचे स्वातंत्र्य अशा विषयांवर कंगना बोलत असते.

बॉलीवूड विरुद्ध टॉलीवूड असा वाद अजुनही सुरुच आहे. गेल्या वर्षभरापासून वेगवेगळ्या प्रकारे समोर येत राहिला. वर्षभरापासून बॉलीवूड आणि टॉलीवूड यांच्यातील वादानं चाहत्यांचे, नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. वर्षभरामध्ये टॉलीवूडच्या चित्रपटांनी बॉलीवूडवर वर्चस्व गाजवल्याचे पाहायला मिळाले. पुष्पापासून झालेली सुरुवात केजीएफ २ पर्यत बॉक्स ऑफिसवर टॉलीवूडनं विक्रमी कमाई केली होती.

यासगळ्यात देशातल्या सर्वोच्च नागरी पुरस्कारांविषयीची चर्चा व्हायरल झाली आहे. त्यामध्ये टॉलीवूडच्या एका प्रसिद्ध अभिनेत्रीनं कंगनाला मिळालेल्या पद्मश्री पुरस्कारावर नाराजी व्यक्त केली आहे. केवळ दहा चित्रपट करुन कंगनाला पद्मश्री मिळतो कसा, आमची हयात गेली तरी आम्हाला अजुनही त्या पुरस्कारानं का गौरविण्यात आलेले नाही. अशी खंत जयसुधा यांनी व्यक्त केली आहे. दरवेळी सरकार टॉलीवूडच्या कलाकारांना का डावलते अशी खंतही त्यांनी बोलून दाखवली आहे. यापूर्वी देखील टॉलीवूडच्या काही कलाकारांनी याविषयी टोकाची प्रतिक्रिया दिली आहे.



# चेन्नईचे पाचवे विजेतेपद!

## » इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट: गुजरात टायटन्सवर पाच गडी राखून मात

| अहमदाबाद | महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**सलामीवीर डेव्हॉन कॉन्वे (२५ चेंडूंत ४७ धावा), शिवम दुबे (२१ चेंडूंत नाबाद ३२) यांच्या खेळीनंतर अष्टपैलू रवींद्र जडेजाच्या (६ चेंडूंत १५ धावा) निर्णायक खेळीच्या बळावर चेन्नई सुपर किंग्ज संघाने इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) अंतिम सामन्यात गतविजेत्या गुजरात टायटन्सवर डकवर्थ-लुईस-स्टर्न पद्धतीनुसार पाच गडी राखून विजय मिळवला व आपले पाचवे विजेतेपद पटकावले.**



पावसाच्या व्यत्ययामुळे राखीव दिवशी खेळवण्यात आलेला अंतिम सामना चांगला चुरशीचा झाला. डकवर्थ-लुईस-स्टर्न पद्धतीनुसार चेन्नईला १५ षटकांत १७१ धावांचे लक्ष्य देण्यात आले. सामन्यात अनेक चढ-उतार पाहायला मिळत होते. वेगवान गोलंदाज मोहित शर्माने गुजरातला जवळपास विजय मिळवून दिला होता. मात्र, जडेजाचे इरादे काहीतरी वेगळेच होते. चेन्नईला अखेरच्या षटकांतील दोन चेंडूंत दहा धावांची आवश्यकता होती आणि पाचव्या चेंडूवर जडेजाने षटकार लगावला. अखेरच्या चेंडूवर त्याने षटकार मारला. त्यानंतर कर्णधार महेंद्रसिंह धोनी वगळता चेन्नईचा पूर्ण संघ मैदानात धावत आला.

त्यापूर्वी, बी साई सुदर्शनच्या ४७ चेंडूंत ९६ धावांच्या खेळीच्या जोरावर गुजरातने २० षटकांत २१४ धावा केल्या. सुदर्शनने आपल्या खेळीत ८ चौकार व ६ षटकार लगावले. त्याच्या प्रत्युत्तरात चेन्नईने आक्रमक सुरुवात केली आणि कॉन्वे व ऋतुराज गायकवाड (१६ चेंडूंत २६ धावा) यांनी पहिल्या गड्यासाठी ३९ चेंडूंत ७४ धावांची भागीदारी केली. अफगाणिस्तानच्या नूर अहमदने सातव्या षटकांत या दोन्ही फलंदाजांना बाद करत संघाला सामन्यात पुनरागमन करून दिले. अजिंक्य रहाणेला (१३ चेंडूंत २७ धावा) मोहितने बाद केले. आपला अखेरचा सामना खेळणाऱ्या अंबाती रायुडूने ८ चेंडूंत एक चौकार व दोन षटकारांसह १९ धावांची खेळी केली. यानंतर मोहितने १३व्या षटकांत सलग दोन चेंडूंत गडी बाद करत गुजरातचे पारडे सामन्यात जड केले.

रायुडू बाद झाल्यानंतर धोनीही मिलरकडे झेल देत माघारी परतला. यानंतर गुजरातच्या गोलंदाजांनी दबाव निर्माण केला व चेन्नईला अखेरच्या षटकांत १४ धावांची आवश्यकता होती. अखेरच्या षटकातील पहिले चार चेंडू मोहितने 'यॉर्कर' टाकले व त्यात चारच धावा झाल्या. मात्र, अखेरच्या दोन चेंडूंत त्याच्याकडून चूक झाली आणि जडेजाने गुजरातकडून विजय हिसकावून घेतला. त्यापूर्वी, गुजरातने दुसऱ्या षटकांत गिलला जीवदान मिळाले. दुसऱ्या बाजूने वृद्धिमान साहाने तिसऱ्या षटकांत १६ धावा करत चेन्नईवर दबाव निर्माण केला. 'पॉवर-प्ले'नंतर गुजरातच्या बिनबाद ६२ धावा होत्या. सातव्या षटकांत गिलला जडेजाने बाद केले. साहाने दुसऱ्या बाजूने खेळताना 'आयपीएल'मधील आपले दुसरे अर्धशतक १३व्या षटकांत पूर्ण केले. त्याने सुदर्शनसह ६४ धावांची भागीदारी केली. साहाला (५४) चहरने बाद केले. गुजरातकडून हंगामात दुसऱ्या सर्वाधिक धावा करणाऱ्या सुदर्शनने आपले तिसरे अर्धशतक पूर्ण केले. पथिरानाने सुदर्शनला बाद केले. हार्दिक पंड्याने १२ चेंडूंत नाबाद २१ धावा केल्या.

### संक्षिप्त धावफलक

» गुजरात टायटन्स : २० षटकांत ४ बाद २१४ (साई सुदर्शन ९६, वृद्धिमान साहा ५४, शुभमन गिल ३९; मथीशा पथिराना २/४४) पराभूत वि. चेन्नई सुपर किंग्ज : १५ षटकांत ५ बाद १७१ (डेव्हॉन कॉन्वे ४७, शिवम दुबे नाबाद ३२, अजिंक्य रहाणे २७, रवींद्र जडेजा नाबाद १५; मोहित शर्मा ३/३६, नूर अहमद २/१७)

---

# फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा: कार्लोस अल्काराझची आगेकूच!

| पॅरिस | महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**स्पेनच्या अग्रमानांकित कार्लोस अल्काराझने पहिल्या फेरीत विजय मिळवत फ्रेंच खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीची दुसरी फेरी गाठली.**



स्पेनच्या अग्रमानांकित कार्लोस अल्काराझने पहिल्या फेरीत विजय मिळवत फ्रेंच खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीची दुसरी फेरी गाठली. यासह नॉर्वेच्या चौथ्या मानांकित कॅस्पर रुड व अमेरिकेच्या टॉमी पॉल यांनी आगेकूच केली, तर महिलांमध्ये अमेरिकेची सहाव्या मानांकित कोको गॉफ व सातव्या मानांकित ट्युनिशियाच्या ओन्स जाबेऊरने पुढची फेरी गाठली.

अल्काराझने इटलीच्या फ्लॅविओ कोबोलीला ६-०, ६-२, ७-५ अशा फरकाने पराभूत केले. सामन्यातील पहिल्या दोन सेटमध्ये अल्काराझने कोबोलीला पुनरागमनाची संधी दिली नाही. तिसऱ्या सेटमध्ये कोबोलीने प्रतिकार केला. मात्र, अल्काराझने आपली लय कायम राखताना विजय नोंदवला. अन्य पुरुष एकेरीच्या सामन्यात जर्मनीच्या अ‍ॅलेक्झांडर झ्वेरेव्हने दक्षिण आफ्रिकेच्या लॉयड हॅरिसला ७-६ (८-६), ७-६ (७-०), ६-१ असे चुरशीच्या लढतीत नमवले. तर, अमेरिकेच्या टॉमी पॉलने स्वित्झर्लंडच्या डॉमिनिक स्टीफन स्ट्रिकरला ६-३, ६-२, ६-४ असे पराभूत केले.

महिला एकेरीत सहाव्या मानांकित गॉफने स्पेनच्या रेबेका मासारोव्हाला ३-६, ६-१, ६-२ असे चुरशीच्या लढतीत नमवत दुसरी फेरी गाठली. सामन्यातील पहिला सेट गमावल्यानंतर गॉफने पुनरागमन करत पुढचे दोन्ही सेट जिंकत विजय साकारला. तर, जाबेऊरने इटलीच्या लुसिया ब्रोंझेट्टीला ६-४, ६-१ असे सरळ सेटमध्ये पराभूत करत आगेकूच केली.

# पुढील वर्षी पुन्हा खेळण्याचा प्रयत्न: महेंद्रसिंह धोनी

| नवी दिल्ली | महाईन्यूज | प्रतिनिधी|

पुढील वर्षी आणखी एक इंडियन प्रीमियर लीगचा (आयपीएल) हंगामात खेळण्याचा प्रयत्न करेन, असे 'आयपीएल'चे जेतेपद मिळवल्यानंतर चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार महेंद्रसिंह धोनी म्हणाला. सोमवारी चेन्नई सुपर किंग्जने अंतिम सामन्यात गुजरात टायटन्सवर पाच गडी राखून विजय मिळवत आपले पाचवे 'आयपीएल' विजेतेपद पटकावले. या हंगामाच्या सुरुवातीला धोनीचे हे अखेरचे 'आयपीएल' सत्र असल्याची चर्चा होती. मात्र, त्याच्या या वक्तव्यानंतर तो आणखी एक हंगाम खेळण्याची शक्यता वाढली आहे.



"परिस्थिती पाहिल्यास निवृत्ती घेण्याची ही सर्वोत्तम वेळ आहे. मी निवृत्ती घेत आहे, हे म्हणणे खूप सोपे आहे. मात्र, आगामी नऊ महिन्यांत कठोर मेहनत घेऊन पुनरागमन करत आणखी एक सत्र खेळणे कठीण आहे. यासाठी शरीराची साथ मिळणेही आवश्यक आहे," असे सामना संपल्यानंतर धोनी म्हणाला. या हंगामात चेन्नईचा संघ ज्या ठिकाणी खेळला, त्या ठिकाणी क्रिकेट चाहते धोनीला खेळताना पाहण्यासाठी स्टेडियममध्ये गर्दी करताना दिसले.

"चेन्नईच्या चाहत्यांना ज्याप्रमाणे मला प्रेम दिले. मी आणखी एक हंगाम खेळल्यास त्यांच्यासाठी ते मोठी भेट असेल.